"RIGHT PLACE FOR BRIGHT FUTURE"
MANOHARBHAI SHIKSHAN PRASARAK MANDAL ARMORI'S
MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE &
LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE COLLEGE
ARMORI Dist. Gadchiroli (M.S.) 441 208
Affiliated to Gondwana University, Gadchiroli
Re-accredited by NAAC 'A' with 3.02 CGPA

PRINCIPAL
Dr. Lalsingh H. Khalsa
M. Sc., Ph. D.
Mob. 9422153197
E-mail:lalsinghkhalsa@yahoo.com

S.T.D.: 07137
Office: 266558/266043
Web: mgcollegearmori.ac.in
E-mail: mgcollege.armori@gmail.com

Letter No. _MGC/_______________

Date _____________

# Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori,Dist. Gadchiroli

## Students Council

## 2020-21

The institution promotes students to actively participate in various Academic, Co-curricular, Extra-curricular, IQAC activities by representing them on various committees.

**Objectives of the Students Representation on various committees of the college.**

**1.** To academically represent all the students of the College.

**2.** To inculcate social responsibility, leadership among the students.

**3** To identify and help solving problems encountered by the students of the College.

**4.** To promote and encourage the involvement of students in organizing Academic, Administrative, Co-curricular and Extra –curricular activities.

The Students Representative contribute to solve the day – today issues i.e. official issues, examination related issues, co-curricular activities, class-related issues, up-down students, Infrastructural facilities, Girls students issues etc. It is essential to bring these issues in view of the college administration and such issues are solved by the concerned authority.

PRINCIPAL
M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College
ARMORI, Dist. Gadchiroli

- **Constitution of Students Council 2020-21**

1) Dr. L. H. Khalsa - Principal, Chairman
2) Dr. C. P. Dorlikar - Vice-Principal
3) Dr. J. N. Papadkar - Head Faculty of Science
4) Prof. N. N. Meshram - Head Faculty of Arts
5) Dr. M. M. Thaore - Head Faculty of Commerce

- **Two Students from each faculty nominated by the Principal**

| Sr. No. | Name of the Student | Class | |
|---|---|---|---|
| 1 | Vaishnavi Tichkule | B.Sc. III | Academic Representative |
| 2 | Sarang N. Jambhule | B.Sc. III | Academic Representative |
| 3 | Reshma Chandankhede | B.A.III | Academic Representative |
| 4 | Akshay Ksheersagar | B.A.III | Academic Representative |
| 5 | Prachi Sahare | B.Com. II | Academic Representative |
| 6 | Sonali B.Chandankhede | B.Com. III | Academic Representative |

| Sr. No. | Name of the Student | Class | |
|---|---|---|---|
| 1 | Priyanka Thakare | B.Sc. III | Cultural Representative |
| 2 | Dipti Raut | B.Sc. III | NSS Representative |
| 3 | Vishal Jaunjalkar | B.Sc.III | Sports Representative |
| 4 | Pawan Kokode | B.A. III | IQAC Representative |
| 5 | - | | CDC Representative |
| 6 | Tejaswini Korami | B.A. III | Women Representation |

Principal
PRINCIPAL
M.G. Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI Distt.Gadchiroli

१०.०६.२०

# सूचना

महाविद्यालयातील Student council (विद्यार्थी परिषदेच्या) सर्व सदस्यांना सुचित करण्यात येते की महाविद्यालयाचा शैक्षणिक व सांस्कृतिक सहभाग वाढावा म्हणून दिनांक 13.07.200 ला सकाळी ११.०० महाविद्यालयाच्या खोली क्र. १३ मध्ये सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी महाविद्यालयाचे प्राचार्य साहेब यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सभेस स्टुडंट कौन्सिलच्या सदस्यांनी आवर्जून उपस्थित राहावे.

चर्चेचे विषय

१ स्पर्धा परीक्षेचे आयोजन
२ खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम
३ महिला सुरक्षा
४ रस्ता सुरक्षा
५ राष्ट्रीय कार्यक्रम
६ व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रम
७ वेळेवर येणारे विषय

M.G. College Armori

PRINCIPAL
M.G. Arts Science &
Late N.P. Commerce College
ARMORI, Dist. Gadchiroli

बैठक . १

आज दिनांक १३.०७.२०२० सोमवारला महात्मा गांधी कला विज्ञान व स्व. नै. पंजवानी वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील खोली क्र. १३ मधे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेत स्टुडंट कौन्सिलची सभा घेण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित आहेत.

1. प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा अध्यक्ष
2. प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर
3. प्रा. डॉ. जे. एन. चापडकर कार्यक्रम अधिकारी विज्ञान शाखा
4. प्रा. एन. एन. मेश्राम कला शाखा
5. प्रा. डॉ. एम. एन. ठवरे वाणिज्य शाखा

विद्यार्थी प्रतिनिधी

1. वैष्णवी ठिनकुले BSC III
2. सारंग मांडुळे BSC III
3. रेश्मा चंदनखेडे BA III
4. अक्षय शिरसागर BA III
5. प्राची सहारे B Com II
6. सोनाली चंदनखेडे B Com III
7. प्रियंका ठाकरे BSC III
8. दीपिका राऊत BSC III
9. विशाल जेंजालकर BSC III
10. पवन कोकोडे BA III

11. तेजस्विनी कोराम्री BA III (Kommunity)

प्रतिनिधीकडून आलेल्या सुचना

1. विद्यार्थ्यांच्या शारीरिक बौद्धिक स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात — विशाल बोंगाडकर
2. महिलांच्या आरोग्य व सुरक्षितेसंबंधाने नियोजन केले जावे — प्रियंका ठाकरे
3. विद्यार्थ्यांना औद्योगिक व व्यावसायिक समुपदेशन कार्यक्रम घेण्यात यावे — प्रिया सहारे
4. विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञान परीक्षा घ्यावी व यासंबंधी मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करावा — पवन कोकोडे
5. आकस्मिक उद्भवणाऱ्या आजाराचे समुपदेशन करावे — तेजस्विनी कोराम्री
6. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे — दिप्ती राउत

प्रतिनिधींच्या सुचनेनुसार खालील ठराव पारित करण्यात आले

1. विद्यार्थ्यांच्या स्पर्धांचे आयोजन केले जावे (बौद्धिक, शारीरिक)
2. महिलांच्या आरोग्याविषयी शिबिराचे आयोजन करावे
3. सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन
4. आकस्मिक समस्या निवारणासाठी मार्गदर्शन शिबिर
5. औद्योगिक व व्यावसायिक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन
6. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे ठरले.

PRINCIPAL
M.G. Arts Science & Late N.P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

M.G. College Armori

सभेचे इतिवृत्त

आज दिनांक १२.०८.२० महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या खोली क्र.१२ मध्ये स्टुडंट कौन्सिलची सभा संपन्न झाली या सभेत विद्यार्थी परिषदेचे सदस्य आणि मार्गदर्शक समिती यांच्यात साधक बाधक चर्चा होऊन खालील ठराव पारित करण्यात आले.

विषय: १ विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व गुणात्मक विकासासाठी कार्यक्रम

ठराव: सभा सुरुवात झाल्यानंतर प्रथम विद्यार्थी प्रतिनिधी निखिल जौंजालकर याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक स्पर्धा घेण्याची सूचना केली या सूचनेला प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी सहमती दर्शवून महाविद्यालयाचे शारीरिक खेळ विभागाचे अधिकारी मा. प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाचे आयोजन करण्याचे ठरले.

विषय २. विद्यार्थिनींच्या सुविधा आणि सुरक्षितता संबंधी विचार करण्यात यावा

ठराव: महाविद्यालयाच्या स्टुडंट कौन्सिलच्या प्रतिनिधी कुमारी प्रियंका ठाकरे हिने केलेल्या सूचनेवर चर्चा झाली आणि महिला आणि विद्यार्थिनींना समुपदेशन करण्यासाठी त्याप्रमाणे त्यांच्या आरोग्यविषयक समस्येकरिता तज्ज्ञ महिला डॉक्टरांची चमू बोलावून शिबिराचे आयोजन करण्याचे ठरले. या सोबतच त्यांना कायदेविषयक जागृती असावी म्हणून महिला कायदेविषयक समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्याचे ठरले. महाविद्यालयात महिला प्राध्यापकांची नेमणूक केली जाणार असे ठरले

विषय ३. औद्योगिक व व्यावसायिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना द्यावे.

ठराव: महाविद्यालयात वाणिज्य शाखेचे अनेक विद्यार्थी आहेत महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची नोकरी मिळविणे हाच उद्देश नसावा. त्यांनी शिक्षणाचा वापर व्यावसायिक क्षेत्रातसुद्धा करावा

या उद्देशाने ~~इ~~ प्रा. सहारे हिने सूचना केली. या सुचनेचे माननीय प्राचार्य यांनी स्वागत करून महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. मनोज हवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग व व्यवसाय मार्गदर्शन केन्द्राचे जिल्ह्यातील अधिकारी आणि सहकाऱ्यांच्या सोबत औद्योगिक व व्यावसायिक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्याचे ठरले.

~~विषय~~
विषय ४: महाविद्यालयात सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन
ठराव: पवन कोकोडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक आणि ज्ञानात्मक स्पर्धा निर्माण व्हावी त्याप्रमाणे स्पर्धा परीक्षेची प्रक्रिया आणि परिचय व्हावा यासाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करावे. या सुचनेचे स्वागत करून प्रा. डॉ. शशिकांत गेडाम यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेचे आयोजन करावे असे ठरले.

विषय ५ सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन
ठराव: विद्यार्थ्यांच्या अभ्यासेतर कलागुणांना वाव मिळावा म्हणून सत्र २०२१ मध्ये कार्यक्रम घेण्यात यावे या विषयी दिप्ती राउत यांनी सुचना केली ती मान्य करून परंपरेप्रमाणेच डिसेंबर महिन्यात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल असे माननीय अध्यक्षांनी सुचविले आणि त्यावर प्रा. शशिकांत गेडाम यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक विभागाव्दारे महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

विषय ६. आकस्मिक समस्या निवारण जागृती
ठराव: महाविद्यालयीन विद्यार्थीनी तेजस्वी कोराम हिने अचानक निर्माण होणाऱ्या ~~र~~ रोगाविषयक समस्यांवर नोंद

Page No.
Date

तोंडाच्या काढण्यासंबंधी सूचना केली यावर प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा आणि त्यांच्या समूहाने विचार करून शारीरिक आजार किंवा मानसिक संकट उदा. कोरोना, इ. आजारासंबंधात जागृती करण्यासाठी, आणि त्यावर मात करावी म्हणून जिल्ह्याच्या तज्ञ अधिकाऱ्यांचे शिबिर आयोजित करण्याचे ठरले.

विषय ६ वेळेवर येणारे विषय

ठराव यानंतर माननीय प्राचार्य साहेब यांनी उपस्थित सदस्यांना इतर आणखी विषय उपस्थित मांडण्याची संधी दिली; परंतु कोणतेही विषय उपस्थित न झाल्यामुळे संचालकांनी उपस्थितांचे आभार मानले व सभा समाप्त करण्यात आली.

M. G. College Armori

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

२. सूचना

१२.२.२३

Page No.
Date

स्टुडंट कौन्सिलच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेत दि. १५.२.२०२३ सोमवारला सकाळी ११-वा. महाविद्यालयाच्या सभागृहात परीक्षेच्या नवीन सुचनेविषयी चर्चा करण्यासाठी उपस्थित राहावे

चर्चेचे विषय

१ कोरोना प्रादुर्भावामुळे प्रशासनाकडून व विद्यापीठाकडून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे

२. बदललेल्या परीक्षा पध्दतीसंदर्भात चर्चा करणे

३ ऑनलाईन पध्दतीने तासिका घेणे

| | पद | |
|---|---|---|
| 1. डॉ. एल. एस. खालसा | | [signature] |
| 2. डॉ. प्रा. चंद्रकांत डोर्लीकर | | [signature] |
| 3. प्रा. डा. जे. एस. पापडकर | | [signature] |
| 4 प्रा. एन. एन. मेश्राम | | [signature] |
| 5. प्रा. डा. एम. एम. ठवरे | | - M. Thawre |

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

विद्यार्थी प्रतिनिधी

| | | | |
|---|---|---|---|
| 1. वैष्णवी टिचकुले | BSc III | [signature] |
| 2 सारंग जांभुळे | BSc III | [signature] |
| 3. रेशमा चंदनखेडे | BA III | - [signature] |
| 4 अक्षय क्षिरसागर | BA III | [signature] |
| 5. प्राची सहारे | BCom II | [signature] |
| 6. सोनाली बी. चंदनखेडे | BCom III | [signature] |

| | | |
|---|---|---|
| 7. | प्रियंका ठाकरे | BSC III |
| 8. | दिप्ती राउत | BSC III |
| 9. | विशाल जौंजालकर | BSC III |
| 10. | पवन कोकोडे | B.A III |
| 11 | तेजास्विनी कोरामी | B.A III |

सभा २.

१५.२.२१

Page No.
Date

आज दिनांक १५.२.२०२१ सोमवार सकाळी ११ वा. महाविद्यालयाच्या सभागृहात प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली सभा संपन्न झाली. या सभेत खालील विषयावर ठराव पारीत करण्यात आले.

1. कोरोना आजाराच्या समस्येमुळे ~~विविध~~ परीक्षा पध्दतीत झालेल्या बदलांची चर्चा करून सर्वानुमते ठराव पारीत करण्यात आला.

2. ऑनलाईन (आभासी) पध्दतीद्वारे तासिका घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करणे.

3. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या सुचनेद्वारे ठरवून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे.

उपस्थितांची स्वाक्षरी-

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

इतिवृत्त

Page No.
Date

सभेस दि. ११ या प्रारंभ झाला. प्रास्ताविक झाल्यानंतर माननीय प्राचार्य यांनी सभेचे विषय वाचून दाखविले. आणि त्यानुसार विद्यार्थी प्रतिनिधींना समस्या मांडण्यासाठी सुचविण्यात आले.

विषय १. कोरोना कालखंडात परीक्षा कशी घेतल्या जाईल?

ठराव :- विज्ञान शाखेची विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. वैष्णवी टिचकुले हिने विचारलेल्या प्रश्नास उत्तर देतांना प्राचार्य डॉ. ढाकुलिंग यादव यांनी सत्र २०२१ मध्ये घेतली जाणारी उन्हाळी परीक्षा ही पर्यायी प्रश्नोत्तर पध्दतीने म्हणजे दिलेल्या अभ्यासक्रमावर एकूण ८० प्रश्न विचारले जातील प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरातील चार पर्यायांपैकी बरोबर असलेल्या उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेत लिहावा लागेल. एकुण वेळ १ तास २० मिनिटाचा असेल आणि यामध्ये स्पष्टीकरणात्मक उत्तरे लिहिण्याची व्यवस्था राहणार नाही. परीक्षा विभागाचे प्रमुख माननीय डॉ. चितांडे यांच्या व्हिडीओ क्लिप मधील संदेशानुसार परीक्षेचे स्वरूप राहिल ही क्लिप विद्यार्थ्यांना ओळखता विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिल्या जाईल अशा सुचना केल्या. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समर्पक व उत्तरे देऊन याशंदर्भात डॉ. चितांडे सरांचे याविषयी जागृती शिबिर आयोजित करण्यात येईल असे ठरले. विद्यार्थी प्रतिनिधींनी हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावा असे सुचविले.

विषय २. ऑनलाईन तासिकाद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करणे.

ठराव : सारंग टिचकुले या विद्यार्थीनीने ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण कसा होईल हा प्रश्न विचारताच मा. प्राचार्य यांनी याकरिता विद्यार्थ्यांकरिता स्मार्ट फोन आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानुसार झूम ॲप डाउनलोड करून विद्यार्थ्यांना या प्रक्रिया शिक्षकांमार्फत समजावून सांगितल्या

जातील परीक्षेपूर्वी विद्यापीठाच्या कॉम्पुटर प्रतिनिधीचे मार्गदर्शन व ऑनलाईन व्हिडीओ संभाषण उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले. ऑनलाईन तासिकांचे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या व्हाट्स ॲपवर पाठविण्याचे ठरले.

विषय ५: कोरोना प्रादुर्भावासंबंधी काळजी घेणे.
ठराव: कोरोना या अतिसंवेदनशील व साथीच्या आजारापासून विद्यार्थ्यांनी कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी या मुद्यासंबंधी सूचना सांगाव्या असा प्रश्न सोनाली चंदनखेडे या विद्यार्थी प्रतिनिधीने उपस्थित केला तेव्हा महाविद्यालय स्तरावर या आजाराचा प्रसार होऊ नये म्हणून महाविद्यालय बंद ठेवले जातील परंतु विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षकांकडून ऑनलाईन वर्ग घेण्याचे ठरले. आणि शासनाकडून विद्यार्थ्यांना दिलेल्या सूचना एस.एम.एस. व्हाट्स ॲप email इ. सेवेद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले जावेत असे ठरले. शासकीय नियमांचे व बंदी आदेशाचे काटेकोरपणे पालन व्हावे म्हणून विद्यार्थ्यांना सॅनिटायझर वापरणे मास्क वापरणे, गर्दी टाळणे, इ. स्वरूपाच्या सूचना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून सरकारी आदेशाची व सूचनांची अंमलबजावणी महाविद्यालय करील असे ठरले. अभ्यासक्रमिक नोट्स विद्यार्थ्यांना ऑनलाईन पुरविले जावेत असे ठरले.

विषय ६. इतर वेळेवर येणारे विषय.
ठराव: माननीय प्राचार्य डॉ. खालसा यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नाची संधी दिली. तेव्हा वेळेवर कोणतेच प्रश्न उपलब्ध न झाल्यामुळे सभा संपन्न झाल्याचे माननीय प्राचार्य यांनी घोषित केले. व सभा संपली.

M.G. Arts Science & Late N.P. Commerce College ARMORI, Distt. Gadchiroli